महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक दुरुस्ती-०२१८/प्र.क्र.८९/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २८ मार्च २०१८.

विषय :- पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई, यांच्या अधिपत्याखालील धारावी व दादर येथील पोलीस निवासस्थानांच्या इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा *(structural audit)* करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ लोहमार्ग-सायन-धारावी/ २९४/ २०१३, दिनांक ०५.०१.२०१८.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई, यांच्या अधिपत्याखालील धारावी व दादर येथील पोलीस निवासस्थानांच्या इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा *(structural audit)* करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामाचे क्षेत्रफळ हे **१७,१६६.०१** चौ.मी. आहे. या कामाकरिता उप विभागीय अभियंता, उत्तर (सा.बां.) उपविभाग, दादर, मुंबई, यांनी **रु.७४.४२ चौ.मी**. या दराने रु.१२,७७,५८०/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई, यांच्या अधिपत्याखालील धारावी व दादर येथील पोलीस निवासस्थानांच्या इमारतींची संरचनात्मक लेखापरीक्षा *(structural audit)* करण्यासाठी **रु.१२,७७,५८०/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) पोलीस आयुक्त, लोहमार्ग, यांनी खर्चाचे अंदाज साक्षांकित करावे.
२) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४१/इमा-२, दिनांक १५.०३.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०४०५१७५४४८४३२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.04.05 17:56:01 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, मुंबई.
२) कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सार्वजनिक बांधकाम) विभाग, मुंबई.
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/विनियम), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).